# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E Mail - pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक :- ०८/०५/२०१८

### येवला व मालेगाव तालुक्यात ०३ गावठी कट्टे हस्तगत - अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे ०३ गुन्हेगार जेरबंद, जबरी लुटमारीचे गुन्हे उघडकीस - स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

नाशिक परिक्षेत्राचे **मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. विनयकुमार चौबे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे परिक्षेत्रातील पाचही जिल्हयांमध्ये अवैध शस्त्रे/अग्निशस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करणेसाठी विशेष मोहिम राबविली जात आहे. सदर मोहिमेदरम्यान नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो.**, व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.**यांनी जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास अवैधरित्या शस्त्रे/अग्निशस्त्रांचा वापर करणारे इसमांवर सत्वर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारे सराईत गुन्हेगारांची माहिती घेणेबाबत तसेच जिल्हयातील औद्योगिकदृष्टया प्रगत असलेल्या शहरांमध्ये परराज्य व बाहेरील जिल्हयातुन अग्निशस्त्रांची देवाण-घेवाण करणारे इसमांचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक ०७/०५/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे मालेगाव पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात अवैधरित्या शस्त्रे वापरणारे इसमांचा शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार काही इसम मालेगाव तालुक्यातील वडगाव शिवारात अवैधरित्या अग्निशस्त्रे विक्री करण्यासाठी येणार असल्याचे समजले वरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचुन **इसम नामे १) रिहान अहमद अशपाक अहमद**, वय ३०, रा. नयापुरा, अरब चौक, मालेगाव यास वडगाव शिवारातील देवरे गार्डन परिसरातुन ताब्यात घेतली. ताब्यात घेतलेले इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात **एक सिल्व्हर रंगाचे गावठी पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे** मिळुन आली आहे. सदर इसमाकडे चौकशी करता त्याचेकडे कोणताही शस्त्र परवाना नसल्याने त्याचेविरूध्द **वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे** ॥ गुरनं १३/२०१८ **भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच स्थागुशाचे दुसरे पथक येवला शहरात अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे इसमांचा शोध घेत असतांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार येवला शहरातील गारूडी गल्ली परिसरातील एक इसम हा अवैधरित्या गावठी पिस्टल वापरत असल्याची माहिती मिळाली, त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने येवला शहरातील संजय गांधीनगर परिसरातील गारूडी गल्लीत रात्रभर सापळा रचुन **सराईत गुन्हेगार नामे २) हरिचंद्र कचरू शेवरे,** वय २८, रा. वांजुळे, ता.दिंडोरी, हल्ली संजय गांधीनगर, येवला यास शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीताची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात **एक देशी बनावटीचे गावठी पिस्टल** मिळुन आले, त्यास विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याचेकडे सदर अग्निशस्त्राबाबत कोणताही परवाना नसल्याचे आढळुन आले असुन त्याचेविरूध्द **येवला शहर पोलीस ठाणे ॥ गुरनं २८/२०१८ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल** करण्यात आलेला आहे.

तसेच सदर आरोपी नामे हरीचंद्र शेवरे याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने गेल्या १५ दिवसांपुर्वी त्याचे साथीदारांसह दिंडोरी तालुक्यतील लखमापुर परिसरात **एका दुचाकीस्वारास रात्रीचे सुमारास अडवुन त्याची मोटर सायकल, मोबाईल व रोख रूपये जबरीने लुटमार केल्याची कबुली** दिली आहे. सदर आरोपीने कबुली दिलेवरून **वणी पोलीस ठाणेकडील I गुन्हा रजि.नं. ७०/२०१८ भादवि कलम ३९२,३४** हा गुन्हा उघडकीस आलेला असुन सदर गुन्हयात आरोपीने जबरीने चोरून नेलेले **टी.व्ही.एस.स्टार सिटी मोटर सायकल किं.रू. ४०,०००/- रू.चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आलेला आहे. तसचे सदर आरोपीने वणी पोलीस ठाणेकडील I गुरनं. ०८/२०१८ भादवि कलम ३२४,५०६,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ हा गुन्हाही केल्याची कबुली दिली असुन सदर गुन्हयात तो फरार होता. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेकडुन जबरी लुटमारीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे, त्यास गुन्हयाचे पुढील तपासकामी येवला शहर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

तसेच दिनांक ०७/०५/२०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास स्थागुशाचे आणखी एक पथक अहमदनगर व नाशिक जिल्हयाचे सिमावर्ती भागात अवैध अग्निशस्त्रे वापरणारे गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी गस्त घालत असतांना येवला ते कोपरगाव रोडवर एक इसम लाल व काळे रंगाचे पल्सर मोटर सायकलवर संशयीतरित्या फिरत असल्याचे समजलेवरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी येवला ते कोपरगाव रोडवर सापळा रचुन **इसम नामे ३) दिपक उर्फ सोनु गुलाब पवार,** वय २२, रा. गणेशखिर्डी, पो. येसगाव, ता. कोपरगाव, जि.अहमदनगर यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाचे कब्जात असलेल्या पल्सर २२० मोटरसायकलची झडती घेतली असता, पेट्रोलटाकीचे बाजुस असलेल्या कुलंटच्या **प्लॅस्टिक बॉक्समध्ये एक गावठी पिस्टल** मिळुन आले, सदर अग्निशस्त्राबाबत चौकशी करता त्याचेकडे कोणताही परवाना नसल्याने त्याचेविरूध्द **येवला शहर पोलीस ठाणेस II गुरनं २९/२०१८ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर इसमाचे कब्जातुन एक बनावट नंबरप्लेट असलेली पल्सर २२० मोटरसायकल, ०१ मोबाईल फोन, व गावठी पिस्टल असा एकुण १,४०,०००/- रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्यास येवला शहर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने ताब्यात घेतलेले वरील आरोपी नामे **१) रिहान अहमद अशपाक अहमद**, वय ३०, रा. नयापुरा, अरब चौक, मालेगाव, **२) हरिचंद्र कचरू शेवरे,** वय २८, रा. वांजुळे, ता.दिंडोरी, हल्ली संजय गांधीनगर, येवला, **३) दिपक उर्फ सोनु गुलाब पवार,** वय २२, रा. गणेशखिर्डी, पो. येसगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर यांचेकडुन वरील गुन्हयांचे समांतर तपासात, तसेच त्यांचे इतर साथीदारांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केलेल्या कारवाईत **०३ गावठी कट्टे, ०२ जिवंत काडतुसे, मोबाईल फोन व दोन दुचाकी असा किं.रू. २,२०,५००/- चा मुद्देमाल हस्तगत** केला असुन आर्म अॅक्ट प्रमाणे ०३ गुन्हे दाखल व जबरी लुटमारीचा ०१, आर्म अॅक्ट ०१ असे गुन्हे उघडकीस आलेले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि **संदिप दुनगहू,** पोउनि **स्वप्निल नाईक,** सपोउनि अरूण पगारे, सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, संजय गोसावी,पोना भरत कांदळकर, रावसाहेब कांबळे, राकेश उबाळे, पोकॉ प्रविण काकड, सुशांत मरकड, संदिप हांडगे, मंगेश गोसावी, भाउसाहेब टिळे, लहु भावनाथ, रतिलाल वाघ, फिरोज पठाण, इम्रान पटेल, संदिप लगड, चापोना भुषण रानडे, राजु वायकंडे अशांचे पथकाने सदरची कामगिरी केली आहे. अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे इसमांवर यापुढेही कारवाई सुरू राहणार आहे.